**महाराष्ट्र शासन**
**सक्षम प्राधिकारी तथा प्रधान सचिव**
अल्पसंख्याक विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

क्रमांक:अशैसं-२००८/३/(९६)/प्र.क्र.३५९/२००८/का१, दिनांक :- २४ ऑगस्ट, २००९.

## अल्पसंख्याक दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र

एक्सलसिएर एज्युकेशन सोसायटी, के.सी. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, मीठबंदर रोड, कोपरी, ठाणे या शैक्षणिक संस्थेने त्यांच्या संस्थेस भाषिक अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था म्हणून दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी दि.१५.६.२००७ रोजी सादर केलेल्या अर्जास अनुसरुन तत्कालीन सक्षम प्राधिकारी तथा प्रधान सचिव व विशेष चौकशी अधिकारी-२, सामान्य प्रशासन विभाग यांनी संबंधित संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसोबत झालेल्या सुनावणीअंती दिनांक २७ जून, २००७ रोजी सदर संस्थेस शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:असंस-२००६/६३४/प्र.क्र.६३/२००६/३५, दि.११ जून, २००७ अन्वये विहित केलेल्या तरतूदीनुसार शैक्षणिक वर्ष २००७-०८पासून पुढील तीन वर्षाकरिता भाषिक (पंजाबी) अल्पसंख्याक दर्जा प्रदान केला होता.

शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्रमांक:अशैसं-२००८/प्र.क्र.१३३/२००८/का.१, दि.४ जुलै, २००८ च्या परिच्छेद (१०) मध्ये विहित तरतूदीनुसार सदर संस्थेने सादर केलेल्या दिनांक ११.८.२००९ च्या अर्जास अनुसरुन एक्सलसिएर एज्युकेशन सोसायटी, के.सी. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, मीठबंदर रोड, कोपरी, ठाणे या शैक्षणिक संस्थेस याद्वारे भाषिक (पंजाबी) अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था म्हणून घोषित करण्यात येत आहे.

हे प्रमाणपत्र केवळ महाराष्ट्र राज्यापुरते लागू असेल. सदर संस्थेस प्रदान करण्यात आलेला भाषिक अल्पसंख्याक दर्जा हा संस्था संचालित करत असलेल्या सर्व शैक्षणिक शाखांना लागू राहील.

उपरोल्लेखित शैक्षणिक संस्थेस याद्वारे प्रदान करण्यात आलेला भाषिक अल्पसंख्याक दर्जा हा शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून विधिग्राह्य असेल. संबंधित संस्थेने अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय, क्र.अशैसं-२००८/प्र.क्र.१३३/२००८/का.१, दि.४ जुलै, २००८ अन्वये विहित करण्यात आलेल्या निकष व अटींची सातत्याने व विनिर्देशपूर्वक पूर्तता करणे बंधनकारक राहील.

टी. एफ. थेकेकरा

( टी. एफ. थेकेकरा )
सक्षम प्राधिकारी तथा प्रधान सचिव,
अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन.
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

क्रमांक:अशैसं-२००८/३/(९६)/प्र.क्र.३५९/२००८/का१, दिनांक :- २४ ऑगस्ट, २००९.

**Competent Authority and Principal Secretary Government of Maharashtra Ministry of Minority Development Department, 32.**

**NUMBER AS 2008/3/ (96)/P.No.359/2008/Ka: 1.**

**Date:24/08/2009.**

**Minority Status Recognition Certificate**

Excelsior Education Society, K.C. College of Engineering, Mibandar Kopri, Thane, an educational institution, has issued a certificate of recognition for its institution as a Linguistic Minority Educational Institution. According to the submissions submitted on 15.6.2007, the then Suksham Authority and Principal Secretary and Special Inquiry Officer 2, Goods Administration Department, after the hearing with the office bearers of the concerned organization, Government Decision dated June, 2007, General Administration Department, No: ARANS-2000 / 634/P.No.63/2006/35, dt. As per the provisions prescribed vide June 11, 2007, linguistic (Punjabi) minority status was granted for the next three years from academic year 2007-08.

Government Decision, Minority Development Department, No: ASAN-2008/P.No.133/200/ Ka. 1, dated 4th July, 2008 in pursuance of the said application dated 11.8.2009 made in accordance with the provisions prescribed in paragraph (10) to Excelsior Education Society, KC College of Engineering, Mithbandar Road, Kopuri, Thane. (Punjabi) being declared as Minority Educational Institution.

This certificate shall be applicable to the state of Maharashtra. The linguistic minority status granted by the said institution shall be applicable to all the academic branches operated by the institution.

The monthly allowance hereby granted to the above mentioned educational institution shall be valid from the academic year 2008/09. The concerned body has issued the Minority Development Department, Government Decision, no. Ashsan-2008/Pro.No.133/2008/Ka.1, dt. 4th July, 20 It will be mandatory to consistently and specifically fulfill the criteria and conditions prescribed.

(T.F. Thekekara)
Competent Authority and Principal Secretary,
Department of Minority Development,
Ministry of Maharashtra Division, Mumbai - 400 032.

K. B. College of Arts & Commerce for Women ★ THANE

I/c Principal
K. B. College of Arts & Comm
Kopri, Thane (E.)

# University of Mumbai

**No. Spl. Cell/2018-19/ 03/2018**

**Circular :-**

Attention of the Principals of the Affiliated Colleges and Directors of the recognized Institutions is invited to University circular No. Spl.Cell/(68)/218/2005 dated 3rd June, 2005 in which distribution of seats in minority and non minority institutions (aided and unaided) has been mentioned. The clarification about 15% management quota was also given in the said circular.

Your attention is also invited to the Circular No. Aff./Recog.I/Admission/(2018-19)/9/ of 2018 dated 30/5/2018, No. Aff./Recog.I/Admission/(2018-19)/10/ of 2018 dated 30/5/2018, No. Aff./Recog.I/Admission/(2018-19)/11/ of 2018 dated 05/5/2018 and No. Aff./Recog.I/Admission/(2018-19)/12/ of 2018 dated 05/5/2018 regarding pre online registration and admission to various categories including minority.

As per the judgment dated 12th October, 2017 by the Hon'ble High Court, Bombay, in Writ Petition 1726 / 2001 in the matter of St. Xavier's College and Maharashtra Association of Minority Education Institutions v/s. Mumbai University and State of Maharashtra, in respect of reservation of seats to the backward class candidates shall not apply for Minority Educational Institutions affiliated to the University of Mumbai

The Distribution of the seats are as under :-

Seats Distribution

**Example : Minority Colleges**

| | |
|---|---|
| Intake Capacity | 100 seats |
| 15% Management Quota | 15 seats |
| Balance | 85 seats |
| 50% Minority (First In-house then outsiders, if seats available - Only for BA/B.Com/B.Sc) | 42 Seats |
| 50% open (First In-house then outsiders, if seats available - Only for BA/B.Com/B.Sc) | 43 seats |

**Example : Non - Minority Colleges**

| | |
|---|---|
| Intake capacity | 100 seats |
| 15% Management Quota | 15 seats |
| Balance | 85 seats |
| 50% Open (First In-house then **outsiders,** if seats available- only for BA/B.Com/B.Sc) | 43 seats |
| 50% reserved (SC/ST/DT/NT/OBC) (First In-house then outsiders if seats available- only for BA/B.Com/B.Sc) | 42 seats |

They are further requested to fill up the seats as per the above example and submit the report in the enclosed proforma (A and B) alongwith the merit lists.

The Principal are hereby requested to adhere by the admission norms laid down by the University and State Government from time to time.

The circular alongwith enclosed proforma (A and B) is uploaded on the University website www.mu.ac.in.

Date : 5th June, 2018

(Dr. Dinesh Kamble)
I/c. Registrar

To
The Principals of the Affiliated Colleges and Directors of the Recognized Institutions.

Copy to :-

The Deputy Registrar (UG/PG)
The Deputy Registrar (Affiliation)
The Deputy Registrar ( Eligibility/Enrollment)
The Deputy Registrar (TAAS)
The Deputy Registrar (PRO), (Statistical Unit)

महाराष्ट्र राज्यातील धार्मिक / भाषिक अल्पसंख्याकांकडून चालविण्यात येणाऱ्या शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थ्यांना प्रवेश देताना अवलंबण्याच्या कार्यपध्दती, अटी व शर्ती यामध्ये सुधारणा करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**अल्पसंख्याक विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांकः अशैसं- २०१२/प्र.क्र.२१/कार्या-५**

**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक**

**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**

दिनांक : १८ जून, २०१४

**वाचा:- शासन निर्णय क्रमांकः अल्पसंख्यांक विकास विभाग क्रमांकः अशैसं- २०१२/प्र.क्र.२१/कार्या-५ दिनांक २७.०५.२०१३**

**प्रस्तावना :-**

राज्यातील अल्पसंख्यांकडून चालविण्यात येणाऱ्या शैक्षणिक संस्थाना धार्मिक /भाषिक अल्पसंख्याक संस्था म्हणून दर्जा प्रदान करण्याबाबतची कार्यपध्दती, अटी व शर्ती संदर्भाधिन शासन निर्णयान्वये विहित करण्यात आल्या आहेत. राज्यातील अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थाना प्रदान केलेल्या संबंधित धार्मिक/भाषिक समुहातील विद्यार्थी उपलब्ध होत नसल्याने वारंवार उच्च, तांत्रिक अथवा व्यवसायिक अभ्यासक्रम चालवणाऱ्या शैक्षणिक संस्थाकडून संदर्भाधिन शासन निर्णयातील कार्यपध्दती, अटी व शर्ती या मध्ये सुधारणा करण्याबाबतची मागणी करण्यात येत होती. याबाबत सर्वंकष विचार करुन उपरोक्त संदर्भाधिन शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन परिपत्रक :-**

प्रवेश भरतीसंबंधी उपरोक्त संदर्भीय शासन निर्णय दि. २७.०५.२०१३ च्या भाग "अ" परिच्छेद क्र. १०(iv) येथील (अ) (ब) व (क) मध्ये सुधारणा करण्यात येत असुन हे सुधारीत परिच्छेद खालील प्रमाणे आहेत.

१० (iv) - अल्पसंख्यांक संस्थांमार्फत चालविण्यात येणा-या उच्च, तांत्रिक अथवा व्यवसायिक शैक्षणिक संस्थांत अल्पसंख्याकांना प्रवेश देणेबाबत :- पदवी / पदविका व पुढील अभ्यासक्रमांसाठी खालील प्रमाणे प्रवेश प्रक्रिया राबविण्यात यावी.

I) अनुदानित अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था :-अ) सर्व अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांनी सामाईक प्रवेश चाचणीद्वारे किंवा गुणवत्तेद्वारे पारदर्शक पध्दतीने प्रवेश करावेत.

(ब) अनुदानित धार्मिक/भाषिक अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांनी त्यांच्या प्रवेश क्षमतेच्या कमीत कमी ५० % जागावर त्यांना प्राप्त झालेल्या अल्पसंख्याक दर्जाच्या समुहातील विद्यार्थ्यांना प्रवेशांमध्ये अग्रक्रम (Priority) देण्यात यावा. जर, संबंधित धार्मिक /भाषिक अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थेस उपरोक्त प्रमाणे त्यांच्या अल्पसंख्याक दर्जा प्राप्त समुहातील धार्मिक/भाषिक ५०% विद्यार्थी उपलब्ध झाले नाहीत, तर पुढील प्रमाणे कार्यवाही करावी.

(i) अनुदानित धार्मिक अल्पसंख्याक संस्था:- अनुदानित धार्मिक अल्पसंख्याक संस्थानी राज्य शासनाने घोषित केलेल्या अन्य धार्मिक अल्पसंख्याक समुहातील विद्यर्थ्यांना प्रवेश द्यावेत व अन्य धार्मिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थ्यी देखील उपलब्ध न झाल्यास अल्पसंख्याक कोटयातील जागांवर भाषिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत व त्यानंतर सर्वंकष प्रयत्न केल्यानंतर सुध्दा काही जागा रिक्त राहिल्यास रिक्त जागी बिगर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शासनाची पूर्वपरवानगी घेऊन प्रवेश देण्यात यावेत.

(ii) अनुदानित भाषिक अल्पसंख्याक संस्था :- अनुदानित भाषिक अल्पसंख्याक संस्थानी राज्य शासनाने घोषित केलेल्या अन्य भाषिक अल्पसंख्याक समुहातील विद्यर्थ्यांना प्रवेश द्यावेत व अन्य भाषिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थीदेखील उपलब्ध न झाल्यास उर्वरित रिक्त अल्पसंख्याक कोटयातील जागांवर धार्मिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत व त्यानंतर सर्वंकष प्रयत्न केल्यानंतर सुध्दा काही जागा रिक्त राहिल्यास रिक्त जागी बिगर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शासनाची पूर्वपरवानगी घेऊन प्रवेश देण्यात यावेत.

(iii) तसेच उर्वरित ५०% जागा खुल्या प्रवर्गातील बिगर अल्पसंख्यांक विद्यार्थ्यामधून भरतांना राज्य शासनाच्या संबंधित शैक्षणिक विभागांनी समाजातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जाती, विमुक्त जाती विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग इ.दुर्बल घटकांसाठी आरक्षित केलेल्या जागाप्रमाणे प्रवेश देणे बंधनकारक आहे.

II विना अनुदानित अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था :- सर्व विना अनुदानित अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांनी सामाईक प्रवेश चाचणीद्वारे किंवा गुणवत्तेद्वारे पारदर्शक पध्दतीने प्रवेश करावेत.

क) विनाअनुदानित धार्मिक/भाषिक अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांनी त्यांच्या प्रवेश क्षमतेच्या कमीत कमी ५१% प्रवेश त्यांना प्राप्त असलेल्या दर्जाच्या समुहाच्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत. जर,

संबंधित धार्मिक /भाषिक अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थेस उपरोक्त प्रमाणे ५१% त्यांच्या अल्पसंख्याक दर्जा प्राप्त समुहातील धार्मिक/भाषिक विद्यार्थी उपलब्ध झाले नाही तर, पुढील प्रमाणे कार्यवाही करावी.

(i) विनाअनुदानित धार्मिक अल्पसंख्याक संस्था:- विनाअनुदानित धार्मिक अल्पसंख्याक संस्थानी राज्य शासनाने घोषित केलेल्या धार्मिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत व अन्य धार्मिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थी देखील उपलब्ध न झाल्यास अल्पसंख्याक कोटयातील जागांवर भाषिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत व त्यानंतर सर्वंकष प्रयत्न केल्यानंतर सुध्दा काही जागा रिक्त राहिल्यास रिक्त जागी बिगर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शासनाची पूर्वपरवानगी घेऊन प्रवेश देण्यात यावेत.

ii) विनाअनुदानित भाषिक अल्पसंख्याक संस्था:- विनाअनुदानित भाषिक अल्पसंख्याक संस्थानी राज्य शासनाने घोषित केलेल्या अन्य भाषिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत व अन्य भाषिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थी देखील उपलब्ध न झाल्यास उर्वरित रिक्त अल्पसंख्याक कोटयातील जागांवर धार्मिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत व त्यानंतर सर्वंकष प्रयत्न केल्यानंतर सुध्दा काही जागा रिक्त राहिल्यास रिक्त जागी बिगर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शासनाची पूर्वपरवानगी घेऊन प्रवेश देण्यात यावेत.

iii) तसेच उर्वरित ४९% जागा खुल्या प्रवर्गातील बिगर अल्पसंख्यांक विद्यार्थ्यामधून भरतांना संबंधित शैक्षणिक संस्थांनी खुल्या प्रवर्गातील तसेच त्यांच्या स्वेच्छेने समाजातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जाती, विमुक्त जाती, विशेष प्रवर्ग इत्यादींना सामाजिक न्याय व समतोल साधण्याकरिता प्रवेश द्यावेत.

वरील प्रमाणे कार्यवाही करताना अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांना भाग "अ" च्या परिच्छेद १०(iv) (ड) मध्ये नमुद केल्याप्रमाणे वृत्तपत्रात जाहिराती प्रसिध्द करण्यात याव्यात व जाहिरातीमध्ये अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थेस प्राप्त धार्मिक/भाषिक अल्पसंख्याक दर्जा प्रमाणे तसेच राज्य शासनाने घोषित केलेले राज्यातील अन्य धार्मिक/भाषिक अल्पसंख्याक व बिगर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकडून, यथास्थिती, अर्ज मागविण्यात यावेत. उपरोक्त जाहिरातीमध्ये संस्थेस प्राप्त अल्पसंख्याक दर्जाचे विद्यार्थी उपलब्ध झाले नाहीत तर, त्यानंतर अन्य अल्पसंख्याक धार्मिक/भाषिक समुहातील विद्यार्थ्यींना गुणवत्तेच्या आधारे प्रवेश देण्यात येतील, असे नमुद करण्यात यावे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१४०६१८१४५१२४२६१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ainul Chand Attar

Digitally signed by Ainul Chand Attar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=MDD, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Ainul Chand Attar
Date: 2014.06.18 14:53:32 +05'30'

**श्रीमती अैनुल अत्तार**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
४. मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
६. प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
७. प्रबंधक, अपिलीय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
८. प्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर, खंडपीठ नागपूर
९. प्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद
१०.प्रबंधक, लोक आयुक्त कार्यालय, मुंबई
११.धर्मादाय आयुक्त, उच्च न्यायालय, मुंबई
१२.महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
१३.सर्व विभागीय आयुक्त
१४.सर्व जिल्हाधिकारी
१५.संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई
१६.संचालक, वैद्यकीय शिक्षण, मुंबई
१७.संचालक, समाजकल्याण संचालनालय, पुणे
१८. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
१९. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
२०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय (प्रसिध्दीसाठी)
२१. निवडनस्ती

**Regarding the amendment in the procedure, terms and conditions to be followed by the educational institutions run by the religious / linguistic minorities in the state of Maharashtra while granting admission to the students.**

**Government of Maharashtra**
**Minority Division**
**Government Circular No: Ashaisam-2012/P.No.21/Work-5**
**Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk**
**Mantralaya, Mumbai 400 032**
Date : 18th June, 2014

**Read:- Govt Decision No: Minority Development Department No: Assaism 2012/P.No.21/ Work-5 dated 27.05.2013**

**Introduction:**

The procedure, terms and conditions for conferring status as religious/linguistic minority institutions to the educational institutions run by minorities in the state have been prescribed as per the relevant government decision. As students from the respective religious/linguistic groups provided to the minority educational institutions in the state are not available, the procedure in the context of the government decision by the educational institutions running higher, technical or professional courses frequently, There was a demand to revise the terms and conditions. After considering this comprehensively, the matter of revising the above mentioned government decision was under the consideration of the government.

**Government Circular:**

The above mentioned government decision regarding admission recruitment dt. Part "A" dated 27.05.2013 para no. (a) (b) and (c) of 10(iv) are being amended and these amended paragraphs are as follows.

10 (iv) - Regarding admission to minorities in higher, technical or vocational educational institutions run by minority institutions:- The following admission procedure should be implemented for degree/diploma and further courses.

1) Aided Minority Educational Institutions :-a) All Minority Educational Institutions shall have admission through Common Entrance Test or Merit in a transparent manner.

K. B. College of Arts & Commerce For Women * THANE

I/c Principal
K. B. College of Arts & Comm
Kopri, Thane (E.)

**Government Circular No: Ashaisam - 2012/P.No.21/Work-5**

(b) Aided Religious/Linguistic Minority Educational Institutions should give priority in admissions to the students belonging to the minority status group they have received in at least 50% of their admission capacity. If, the concerned religious/linguistic minority educational institution does not get 50% religious/linguistic students from its minority status group as above, then the following should be done.

(1) Aided religious minority institutions :- Aided religious minority institutions should admit students from other religious minority groups as declared by the state government and if students from other religious minority groups are not available, they should admit students from linguistic minority groups on minority quota seats and after that even after making all efforts, some Prior permission of Govt for non-minority students in case of vacancy should be admitted.

(ii) Aided Linguistic Minority Institutions :- Aided Linguistic Minority Institutions should admit students belonging to other linguistic minority groups declared by the State Government. And if students from other linguistic minority groups are also not available, the remaining vacant minority quota seats should be given to the religious minority group students and after that even after all efforts, if some seats remain vacant, non-minority students should be admitted to the vacant seats with the prior permission of the government

Also, the remaining 50% of the seats will be filled from the non-minority students of the open category by the relevant educational departments of the state government for the scheduled castes, scheduled tribes, nomadic castes, freed castes, special backward classes and other backward classes etc. It is mandatory to give admission as reserved seat for weaker sections.

Unaided Minority Educational Institutions :- All Unaided Minority Educational Institutions should conduct admission through Common Entrance Test or Merit in a transparent manner.

c) Unaided Religious/Linguistic Minority Educational Institutions should admit at least 51% of their admission capacity to minority students belonging to the rank group they receive. if,



K. B. College of Arts & Commerce For Women ★ THANE

I/c Principal
K. B. College of Arts & Comm
Kopri, Thane (E.)

**Government Circular No: Ashaisam - 2012/P.No.21/Work-5**

If the concerned religious/linguistic minority educational institution does not get 51% religious/linguistic students from its minority status group as above, the following action should be taken. (1) Unaided Religious Minority Institutions :- Unaided religious minority institutes should admit students belonging to religious minority groups as declared by the state government and if students belonging to other religious minority groups are also not available then students belonging to linguistic minority groups should be given admission to minority quota seats and after that even after all-out efforts if some seats remain vacant, prior permission of non-minority students should be given to non-minority students. should be admitted.

ii) Unaided Linguistic Minority Institutions :-Linguistic minority institutions should admit students from other linguistic minority groups as declared by the state government and if students from other linguistic minority groups are also not available, they should admit students from religious minority groups to the remaining vacant minority quota seats and after that even after making all efforts, if some seats remain vacant, the vacant seats should be given to non-minority students. Admission should be given with prior permission of Govt.

iii) Also the remaining 49% seats should be given to Bharatas from among non-minority students in the open category by the respective educational institutions in the open category as well as by their own free will to the Scheduled Castes, Scheduled Tribes, Nomadic Castes, Freed Castes, Special Classes etc. in order to achieve social justice and balance.

While proceeding as above, the minority educational institutions should publish advertisements in the newspaper as mentioned in paragraph 10 (iv) (d) of Part "A" and in the advertisement the religious/linguistic minority status obtained by the minority educational institution and other religious/linguistic status of the state as declared by the state government. Applications should be invited from minority and non-minority students, as the case may be. In the above advertisement, it should be mentioned that if minority status students are not available to the institution, then students belonging to other minority religious/linguistic groups will be given admission on the basis of merit.



K. B. College of Arts & Commerce For Women ★ THANE

Principal
K. B. College of Arts & Comm
Kopri, Thane (E.)

**Government Circular No: Ashaisam - 2012/P.No.21/Work-5**

The said government circular has been made available on the website www.maharashtra.gov.in of the Government of Maharashtra and its reference number is 201406181451242614. This order is being authenticated with digital signature.

**By order and in the name of the Governor of Maharashtra.**

**Ainul**
**Chand Attar**

**copy,**

Joint Secretary, Government of Maharashtra

1. Hon. Secretary to the Governor,
2. Hon. Principal Secretary to Chief Minister,
3. Hon. Secretary to the Deputy Chief Minister,
4. Hon. Private Secretary to the Minister / Minister of State,
5. Additional Chief Secretary / Principal Secretary / Secretary, Ministry Department, Ministry, Mumbai
6. Manager, Original Justice Branch, High Court, Bombay
7. Manager, Appellate Branch, High Court, Bombay
8. Manager, High Court, Bombay, Nagpur, Bench Nagpur
9. Manager, High Court, Bombay, Aurangabad Bench, Aurangabad
10. Manager, Office of the Public Commissioner, Mumbai
11. Charity Commissioner, High Court, Bombay
12. Accountant General, State of Maharashtra, Mumbai / Nagpur
13. All Divisional Commissioners
14. All Collectors
15. Director, Technical Education, Mumbai
16. Director, Medical Education, Mumbai
17. Director, Directorate of Social Welfare, Pune
18. Director, Maharashtra State Council of Educational Research and Training, Pune
19. Secretary, Maharashtra Legislature Secretariat, Vidhan Bhavan, Mumbai
20. Director General, Directorate General of Information and Public Relations (for publicity)
21. election



K. B. College of Arts & Commerce For Women THANE

I/c Principal
K. B. College of Arts & Comm
Kopri, Thane (E.)